अपिलार्थी यांनी दि.०८.०९.२०२५ (०७) व दि.०९.०६.२०२५ (०९) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये १६ द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी त्यांच्या १६ जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| अ.क्र. | बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|---|
| १ | १७ | ०५.०५.२०२५ | दि.०१ जानेवारी २०२३ ते आजपर्यंत आपल्या कार्यालया अंतर्गत (मग्रारोहयो योजना) बांधावरील वृक्ष लागवाड संख्या व तालुक्यातील मजुर मागणी त्यानुसार करण्यात आलेले मस्टरनिहाय पेमेंट इ. माहिती तपशिलवार देण्यात यावी, |
| २ | १८ | ०५.०५.२०२५ | दि.०१ जानेवारी २०२३ ते आजपर्यंत आपल्या कार्यालया अंतर्गत (मग्रारोहयो योजना) बांधावरील वृक्ष लागवाड संख्या व तालुक्यातील मजुर मागणी त्यानुसार करण्यात आलेले मस्टरनिहाय पेमेंट इ. माहिती तपशिलवार देण्यात यावी, |
| ३ | १९ | ०५.०५.२०२५ | दि.०१ जानेवारी २०२४ ते आजपर्यंत आपल्या विभागातार्फत राबविण्यात आलेल्या कुशल व अकुशल मजुरांची यादी तसेच अकुशल मजुरांना देण्यात आलेले मस्टरनिहाय पेमेंट एमबीसह आणि न देण्यात (यादीनुसार) मजुर व कुशल मजुरांना मस्टरनिहाय पेमेंट एमबीसह इस्टीमेंटप्रमाणे तपशिलवार माहिती देण्यात यावी, |
| ४ | २० | ०५.०५.२०२५ | दि.०१ जानेवारी २०२३ ते आजपर्यंत आपल्या कार्यालया अंतर्गत (मग्रारोहयो योजना) बांधावरील वृक्ष लागवाड संख्या व तालुक्यातील मजुर मागणी त्यानुसार करण्यात आलेले मस्टरनिहाय पेमेंट इ. माहिती तपशिलवार देण्यात यावी, |
| ५ | २१ | ०५.०५.२०२५ | दि.०१ जानेवारी २०२३ ते आजपर्यंत आपल्या कार्यालया अंतर्गत (मग्रारोहयो योजना) बांधावरील वृक्ष लागवाड संख्या व तालुक्यातील मजुर मागणी त्यानुसार करण्यात आलेले मस्टरनिहाय पेमेंट इ. माहिती तपशिलवार देण्यात यावी, |
| ६ | २२ | २२.०४.२०२५ | दि.०१ जानेवारी २०२४ ते आजपर्यंत आपल्या उपविभागामार्फत करण्यात आलेल्या रस्ते दुरुस्ती, पुलदुरुस्ती, नवीन रस्ता, जुने रस्त्याचे खड्डे भरणे, साईड पंखे भरणे व इतर कामाची रस्तेनिहाय गावनिहाय खर्चासह यादी, |
| ७ | २३ | ३०.०४.२०२५ | दि.०१ जानेवारी २०२३ ते आजपर्यंत आपल्या कार्यालयात कार्यरत असलेले अधिकारी, कर्मचारी, मंडळ कृषि अधिकारी, पर्यवेक्षक, कृषि सहायक व इतर मुख्यालयी राहत असल्याचे घरभाडे पावत्या व नगर पंचायतीचे ठराव इत्यादी माहिती, |
| ८ | २४ | ०६.०१.२०२५ | दि.०१ जुन २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाचे भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगर पंचायतचा ठराव इ. माहिती, |
| ९ | २५ | ०६.०१.२०२५ | दि.०१ जुन २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाचे भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगर |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | पंचायतचा ठराव इ. माहिती, |
| १० | २६ | ०६.०१.२०२५ | दि.०१ जुन २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाचे भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगर पंचायतचा ठराव इ. माहिती, |
| ११ | २७ | ०६.०१.२०२५ | दि.०१ जुन २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाचे भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगर पंचायतचा ठराव इ. माहिती, |
| १२ | २८ | ०६.०१.२०२५ | दि.०१ जुन २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाचे भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगर पंचायतचा ठराव इ. माहिती, |
| १३ | २९ | ०६.०१.२०२५ | दि.०१ जुन २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाचे भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगर पंचायतचा ठराव इ. माहिती, |
| १४ | ३० | ०६.०१.२०२५ | दि.०१ जुन २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाचे भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगर पंचायतचा ठराव इ. माहिती, |
| १५ | ३१ | ०६.०१.२०२५ | दि.०१ जुन २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाचे भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगर पंचायतचा ठराव इ. माहिती, |
| १६ | ३२ | ०६.०१.२०२५ | दि.०१ जुन २०२० ते आजपर्यंत आपल्या शाळेत कार्यरत असलेले मुख्याध्यापक, शिक्षक, शिक्षिका व शिक्षकेत्तर कर्मचारी मुख्यालयी राहत असलेल्या ठिकाणाचे भाडेकरार पावती व सदरील ग्रामपंचायत किंवा नगर पंचायतचा ठराव इ. माहिती, |

२. प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. आज रोजीच्या व यापूर्वीच्या आयोगापुढील सुनावणीच्या अनुषंगाने आयोगाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, अपिलार्थी हे नियमित माहिती अधिकारातंर्गत माहिती, प्रथम अपील व व्दितीय अपिले सादर करतात. या प्रकरणी अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपिले दाखल करताना व्दितीय अपिलामध्ये व्दितीय अपील दाखल करण्याचे कोणतेही प्रयोजन नमूद केलेले नाही. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली बहुतांश माहिती विस्तृत, व्यापक व मोघम स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे अशा स्वरुपाचे माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत.

३. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

"ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब

देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत."

आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्यता कायम राखतांना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विविक्षत माहिती पुरविण्याकरिता तरतूद करणे इष्ट होईल. म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालविणे आणि माहिती अधिकाराचे कामकाजात सुसूत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

४. मा.सर्वोच्च न्यायालयाने सिव्हील अपील 6454/2011, दिनांक ०९.०८.२०११ रोजी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where 75 % of the staff of public authorities spend 75 % of their time in collecting and furnishing information to applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

५. मा.उच्च न्यायालय आंध्रप्रदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र.20182, दिनांक २७.०१.२००९ मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure

(५/६)

information just for the sake of it, and without there being nay useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources, that are available. Diversion of such resources, for this task would obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to impart a sense of responsibility on those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic."

०६. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग यांनी वेळोवेळी पारित केलेले निर्णय विचारात घेता, एकाच व्यक्तीने मोठ्या संख्येने माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज / अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत / अपेक्षित नाही. यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालयास / प्राधिकरणास वेठीस धरत असुन त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाज ठप्प होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. अशा मोठ्या स्वरुपात अर्ज करण्याच्या सवयीमुळे संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडुन सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे त्या महत्वाच्या शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार मोठ्या प्रमाणात माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**<u>आदेश</u>**

अपिलार्थी यांची उपरोक्त १६ व्दितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.

(स्वाक्षरी)

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जावक क्र. 536 दि. 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ००६९/२०२५**
**बोर्ड क्र.३३**

श्री.अमोल जमाल तडवी,
रा.फत्तेपुर रोड, भोकरदन, ता.भोकरदन, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उपअधीक्षक (गृह),
पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०६.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.रविंद्र देविदास निकाळजे, पोलीस उपअधीक्षक (मु) उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.०८.२०२४ | १.अशोक गोविंदराव कानडे चेस्ट नं.७५८, २. ओम विठ्ठलराव तांबोळी चेस्ट नं.१२१५ या अर्जदारांची महाराष्ट्र राज्य पोलीस भरती २०२२-२०२३, घटक कार्यालय एसपी जालना मध्ये पोलीस शिपाई या पदासाठी निवड झाली आहे, मी प्रतिक्षा यादीमध्ये आहे, वरील उमेदवार गैर आदिवासी असल्यामुळे मी नोकरीला मुकलो असुन बाधित झालो आहे, आपल्या कार्यालयाकडे यांची निवड पोलीस शिपाई पदावर झाली असुन त्याने अनुसुचित जमाती दाव्याच्या अनुषंगाने दाखल केलेले संपूर्ण कागदपत्र अवलोकनासाठी उपलब्ध करुन द्यावे आवश्यकतेनुसार छायांकित प्रती उपलब्ध करुन द्याव्यात, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. वास्तविक माहिती अर्जात नमूद दोन उमेदवारांची पोलीस शिपाई म्हणून निवड झालेली आहे. मात्र त्यांनी सादर केलेले अनुसुचित जमातीचे कागदपत्र खोटे असल्यामुळे जात पडताळणी समितीने त्यांची प्रमाणपत्रे रद्द केलेली आहेत. अपिलार्थी हे सदर भरतीकरिता उमेदवार असुन सद्यस्थितीत अपिलार्थी हे प्रतिक्षा यादीमध्ये समाविष्ठ आहेत. संबंधित दोन गैर आदिवासी उमेदवारांची निवड झाल्यामुळे

अपिलार्थी यांच्यावर अन्याय होऊन नोकरीला मुकले आहेत. मात्र जन माहिती अधिकारी यांनी या ना त्या कारणाने माहिती देण्यास टाळाटाळ केलेली आहे. सदर माहिती मिळाल्यास झालेल्या अन्यायाविरुध्द सक्षम प्राधिकरणाकडे रितसर दाद मागणे साईचे होणार असल्यामुळे मागणी केलेली माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्यामुळे व अशी माहिती व्यापक जनहित न साधणारी असल्याने जन माहिती अधिकारी यांनी माहिती नाकारलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१७.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या भूमिकेचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती नाकारली, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असली तरी अपिलार्थी यांनी आज सुनावणीदरम्यान आयोगासमक्ष केलेला युक्तिवाद विचारात घेता, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये जनहित असल्याचे निदर्शनास येत आहे. म्हणून प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१७.१०.२०२४ रोजी पारित केलेला निर्णय अधिक्रमित करुन अपिलार्थीस सत्वर माहिती प्राप्त होण्याच्या दृष्टीकोनातुन अधिनियमातील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार अपर पोलीस अधीक्षक, पोली अधीक्षक कार्यालय, जालना यांना या प्रकरणी आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 537 दिनांक : 16/1/26 नोंदणीकृत टपालाव्दारे

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
पोलीस अधीक्षक, पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २१४/२०२५**
**बोर्ड क्र.३४**

श्री.रामभाऊ सिताराम आंबुलकर, — अपिलार्थी
रा.आर.एस.आंबुलकर, प्लॉट नंबर १६, रमानगर (८५ प्लॉट एरिया), बेलतरोडी रोड, नागपूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस उपअधीक्षक (मु),
पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.१२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मु), श्री.रविंद्र देविदास निकाळजे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०८.२०२४ | महाराष्ट्र शासन गृह विभागाच्या दि.२०.०९.२०२२ च्या शासन निर्णयानुसार कोरोना काळातील प्रतिबंधात्मक आदेशांचे उल्लंघन झाल्यामुळे दाखल करण्यात आलेले खटले परत घेण्याविषयी आदेश होते, त्या अनुषंगाने १. कोरोना काळातील गुन्हे वापस घेण्याबाबत दि.२०.०९.२०२२ चा शासन निर्णयासंबंधात आवश्यक कार्यक्षेत्रात दि.२१.०३.२०२० ते दि.३१.०३.२०२२ पर्यंत (कोरोना काळात) भा.द.वि. कलम १८८ व आपत्ती व्यवस्थापन कायद्याचे उल्लंघन केल्याबद्दल दाखल करण्यात आलेल्या गुन्ह्यांची संख्या व इतर पाच मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पोलीस स्टेशनशी संबंधित असल्यामुळे अशी माहिती कलम ५ (४) मधील तरतुदीनुसार एकत्रित / संकलित करुन दि.२६.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना निर्देशित

केलेले आहे. सदर प्रथम अपील निर्णयानंतर अपिलार्थीस माहिती देण्यात आलेली आहे. सदर मागणी केलेली माहिती कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पोलीस स्टेशनकडुन एकत्रित / संकलित करुन अपिलार्थीस द्यावयाची असल्यामुळे माहिती देण्यास काही विलंब झालेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न देणे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 538 दिनांक : 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५४७ व ५४८/२०२५ (०२)**

श्री.केशव धनसिंग चव्हाण,
रा.शेवगा, पो.नेरी, ता.जि.जालना — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, मौजपुरी, ता.जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, परतूर, जि.जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस निरीक्षक, श्री.ए.वाय.पाटील उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ३५ | १४.११.२०२४ | मुद्दा क्र.१. दि.०३.११.२०२२ ला गुन्हा नं.३३३/२०२२, कलम ४०६, ४२० ची तपासणी केली त्याचा अहवाल कोर्टात जमा केला त्याची प्रमाणित प्रत, मुद्दा क्र.०२. त्याच तपासाचे पंचनामा केला गेला त्या पंचनाम्याची प्रमाणित प्रत मिळावी, |
| ३६ | १४.११.२०२४ | मुद्दा क्र.१. आपल्या कार्यक्षेत्रातील बिट नेर विभागामध्ये आजपर्यंत २०२१ ते २०२४ पर्यंत आपणाकडे एकूण तपास किती आले त्याची नावासहीत यादी मिळावी, मुद्दा क्र.२. एकूण तपासापैकी किती तपास निकाली काढले त्याची नावासहीत यादी, मुद्दा क्र.३. कोर्टात किती दाखल झाले याची नावासहीत यादी व खरेही नाही खोटेही नाही असे किती प्रकरण तपासात आढळले त्याची नावासहीत यादी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी या पदाचा पदभार नुकताच स्विकारलेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तथापि अपिलार्थी यांनी मागणी केलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्याची

कार्यवाही अनुसरण्यात येईल. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात उपविभागीय पोलीस अधिकारी हे प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून पदनिर्देशित आहेत. मात्र अपिलार्थी यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी यांचेकडे प्रथम अपील दाखल केले असल्याचे निदर्शनास येत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, मौजपुरी, ता.जि.जालना यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 539 दिनांक : 16/1/26 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८४०/२०२५**
**बोर्ड क्र.३७**

श्री.मधुसुदन पिराजी शिलवंत, — अपिलार्थी
रा.जय बाळकृष्ण सदन, पुंडलिक नगर, वार्ड नंबर ०६, प्रविण करडेल पोस्टमन यांचे घराजवळ, चिखली, जि.बुलढाणा

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, टेंभुर्णी, ता.जाफ्राबाद, जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, भोकरदन, जि.जालना

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस निरीक्षक, श्री.के.बी.भारती उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १८.१२.२०२४ | तक्रार अर्जाची माहिती जिल्हाधिकारी जालना व विभागीय आयुक्त छत्रपती संभाजीनगर यांचे आदेशाचे अनुपालन करुन माहिती मिळणेबाबत तीन मुद्यांवर (१० उपमुद्यांवर) माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती असमाधानकारक पुरविलेली आहे. सदर माहिती अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांचा मूळ माहितीचा अर्ज जालना पोलीस अधीक्षक कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सदर अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती पोलीस स्टेशनशी संबंधित असल्यामुळे जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (गृह), पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना यांनी त्यांच्या दि.३०.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये माहितीचा अर्ज पोलीस स्टेशन, टेंभुणी या कार्यालयाकडे वर्ग केलेला आहे. अपिलार्थी यांच्या या अर्जाच्या अनुषंगाने दि.१२.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती अर्जात नमूद मुद्यांच्या अनुषंगाने माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत करण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.०२.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील

निकाली काढलेले आहे. वास्तविक अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे माहितीची मागणी करताना ती १५० पेक्षा शब्दांव्दारे केलेली आहे. असे जरी असले तरी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने सकारात्मक दृष्टीकोन ठेऊन अभिलेखामध्ये उपलब्ध असलेली वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, असमाधानकारक माहिती पुरविली, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी असमाधानकारक माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.------------ दिनांक :--------------

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २८८/२०२५**
**बोर्ड क्र.३८**

श्री.मधुसुदन पिराजी शिलवंत,
रा.जय बाळकृष्ण सदन, पुंडलिक नगर, वार्ड नंबर ०६, प्रविण करडेल पोस्टमन यांचे घराजवळ, चिखली, जि.बुलढाणा — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उपअधीक्षक (मुख्यालय),
पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
अपर पोलीस अधीक्षक,
पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२०.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक (मु), श्री.रविंद्र देविदास निकाळजे, उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.११.२०२४ | जावक रजिस्टरची सत्यप्रत मिळणे, दि.०१.०८.२०२३ ते दि.३१.०९.२०२३, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहिती अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२७.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, माहितीपोटीच्या रु.५२२/- इतक्या शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित करण्यात आलेले आहे. तथापि अपिलार्थी यांनी विहित शुल्काचा भरणा केला नसल्यामुळे माहिती पुरविण्यात आलेली नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२७.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती कार्यालयात उपलब्ध असुन त्यांनी शुल्काचा भरणा केल्यास त्यांना माहिती उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती

पुरविली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीपोटीच्या विहित शुल्काचा भरणा करणेबाबत सुचित केले असल्याचे दिसुन येत आहे. तथापि अपिलार्थी यांनी विहित शुल्काचा भरणा केला असल्याचे दिसुन येत नाही. अत: अपिलार्थी यांना माहितीची आवश्यकता असल्यास जन माहिती अधिकारी यांनी सुचित केल्याप्रमाणे विहित शुल्काचा भरणा करुन माहिती प्राप्त करुन घेणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 540 दिनांक : 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १०५५/२०२५**
**बोर्ड क्र.३९**

श्री.वामन एकनाथ उगले, — अपिलार्थी
रा.प्रगती चाळ नंबर ०२, रुम नंबर ०४, घर क्र.८६८६, सावंत पार्कच्या पाठीमागे, खदानजवळ, महालक्ष्मी नगर, अंबरनाथ (पू), जि.ठाणे

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, सेवली, ता.जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, परतूर, जि.जालना

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१२.०३.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस निरीक्षक, श्री.योगेश एकनाथ खटकळ, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.बालाजी मदनराव वैद्य, सहायक पोलीस निरीक्षक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.१०.२०२४ | दि.०१.०६.२०२४ ते दि.३०.०६.२०२४ या कालावधीतील आवक नोंदवहीच्या प्रमाणित प्रतीत माहिती, वरिष्ठ कार्यालय तसेच विविध विभाग व कार्यासनाकडुन प्राप्त नोंदवही संदर्भ ३९६२, ४०४८, ४०३४, ३४७८, ३४७६, ३४०९, दि.०१.०६.२०२४ पासुन दि.२०.०६.२०२४ पर्यंतच्या प्राप्त पत्रांच्या प्रमाणित प्रतीत माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. माहिती अर्जानुसार ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.१७.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०७.०१.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिली असल्याचा निष्कर्ष काढुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 541 दिनांक : 16/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २८८८/२०२५**
**बोर्ड क्र.४०**

श्री.बालाजी रामदास गायके,
रा.सोमठाणा, ता.बदनापूर, जि.जालना — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
होमगार्ड कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
जिल्हा समादेशक,
होमगार्ड कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०८.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्री.किशोर फुलसिंग राठोड उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १७.०३.२०२५ | १. जालना जिल्हा होमगार्ड प्रक्रिया २०२४ मधील सुधारित अंतरिम प्रतिक्षा यादी, २. जालना जिल्हा होमगार्ड प्रक्रिया २०२४ मधील चेस्ट नं.१४९६ व रजिस्ट्रेशन नं.४२१५ ह्यिने अनिल अशोकराव मिळालेल्या स्किल मार्क ०२ ची संपूर्ण माहिती व उर्वरित २७ मार्काची संपूर्ण माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे. माहिती अर्जानुसार ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.०९.०६.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२८.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, चुकीची व

दिशाभूल करणारी माहिती, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 542 दिनांक : 16/1/26.

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३११९/२०२५**
**बोर्ड क्र.४२**

श्री.विनोद भास्कर मरकड,
रा.गोंदी, ता.अंबड, जि.जालना — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, गोंदी, ता.अंबड, जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, अंबड, जि.जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.रामेश्वर ए.काकड, पोलीस उपनिरीक्षक उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०३.२०२५ | पोलीस अधीक्षक कार्यालयास दिलेला तक्रार अर्ज दि.०८.१२.२०२२ या तारखेला कारवाई केलेली माहिती. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेली माहिती मोघम स्वरुपाची आहे. माहिती अर्जानुसार ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०५.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत केलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२२.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अभिलेखावर उपलब्ध नसल्याचा निष्कर्ष काढुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मोघम स्वरुपाचे पत्र दिले, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी मोघम माहिती

मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी या सर्व बाबींचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२२.०५.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.: 543 दिनांक : 16/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३५४४/२०२५**
**बोर्ड क्र.४३**

श्रीमती मैनाबाई त्र्यंबकराव सोलाटे, — अपिलार्थी
रा.रुम नंबर १०१, सी-विंग, भक्ती पार्क, मोर्वा गाव, भाईंदर (प),
ठाणे

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, अंबड, जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, अंबड, जि.जालना

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२९.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.रामेश्वर ए.काकड, पोलीस उपनिरीक्षक उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १३.०२.२०२५ | दि.१६.१२.२०२४ रोजी न्यायालयीन कामकाजात फसवणूक बेकायदेशीर आणि अयोग्य वर्तन, धमक्या, अश्लील संदेश आणि जातीचा अपमान केल्याबद्दल गुन्हा नोंदविण्याबाबत, वकील लक्ष्मण गायके यांच्या विरुध्द दाखल केलेल्या लेखी तक्रारी अर्जासंबंधित माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहिती अर्जानुसार ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दि.०९.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जातील माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत केलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०९.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाल्याचे सांगितल्यावरुन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी या सर्व बाबींचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.०५.२०२५ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.: 544 दिनांक :- 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ३८९३ व ३८९४/२०२५ (०२)

श्री.शरद लक्ष्मण तौर,
रा.सावरगाव बु., ता.परतूर, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, आष्टी, ता.परतूर, जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, परतूर, जि.जालना — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२०.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस निरीक्षक, श्री.गणेश शिवाजीराव सुरवसे, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.बालाजी मदनराव वैद्य, सहायक पोलीस निरीक्षक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ४५ | ०४.१२.२०२४ | अर्जदाराने दि.१२.१२.२०२२ रोजी पो.स्टे. आष्टी येथील पो.कॉ.जगन्नाथ सुके, श्री.काकडे यांनी अर्जदाराला रस्ता तयार करण्याच्या कारणावरुन केलेल्या मारहाणीबाबत तक्रारीचे काय झाले, त्यांच्या विरुध्द अद्यापपर्यंत कोणती कार्यवाही केली त्याबाबत सविस्तर माहिती लेखी स्वरुपात, |
| ४६ | ०४.१२.२०२४ | दि.३१.०१.२०२२ रोजी अर्जदाराने पो.स्टे. आष्टी ता.परतूर येथे कार्यरत असलेले पोलीस कर्मचारी श्री.जगन्नाथ सुके, श्री.काकडे व अन्य एक यांनी अर्जदाराला अमानुषपणे मारहाण केलेल्या तक्रारी बाबत त्यांच्या विरुध्द कोणती कार्यवाही केली, कार्यवाही केली असल्यास काय कार्यवाही झाली, केली नसेल तर कार्यवाही का झाली नाही त्याबाबत सविस्तर माहिती लेखी स्वरुपात, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. माहिती अर्जानुसार ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या

अनुषंगाने दि.१८.०१.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, दि.१२.१२.२०२२ रोजी पो.स्टे.आष्टी येथील पोलीस अंमलदार श्री.जगन्नाथ सुके, श्री.काकडे यांच्याविरुध्द दिलेला कुठलाही अर्ज पो.स्टे. रेकॉर्डवर उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०५.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांच्या तक्रार अर्जाची प्रत पोलीस स्टेशनला उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने करण्यात आलेल्या कार्यवाहीची माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस दि.२०.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अवगत करण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 545 दिनांक :- 16/1/26

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४३५५/२०२५**
**बोर्ड क्र.४८**

श्री.पावरा मेरसिंग भिका,
रा.नवीन बसस्टँड समोर, घनसावंगी, ता.घनसावंगी, जि.जालना — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, घनसावंगी, जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, अंबड, जि.जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.रामदास पां. काळे, पोलीस उपनिरीक्षक, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.रामेश्वर ए.काकड, पोलीस उपनिरीक्षक उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०६.२०२५ | पोलीस निरीक्षक, बटेवाड साहेब यांच्या कार्यकाळात सन २०१८-१९ या कालावधीत प्राचार्य, संत रामदास महाविद्यालय घनसावंगी यांनी व इतरांनी मिळुन प्रा.पावरा मेरसिंग भिका यांच्यावरील दाखल गुन्ह्याची सत्यप्रत देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी दि.१९.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिशः स्विकारुन माहिती मिळाली अशी पोच दिलेली आहे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात उपविभागीय पोलीस अधिकारी, अंबड हे प्रथम अपिलीय अधिकारी म्हणून पदनिर्देशित आहेत. तथापि अपिलार्थी यांचा प्रथम अपिलाचा अर्ज उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयास अप्राप्त असल्याने सदर प्रथम अपिलाच्या अनुषंगाने प्रथम अपिलीय अधिकारी यांना कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यात यावी, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी

यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे व अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेऊन माहिती मिळाली अशी पोच दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 546 दिनांक : 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४६२२/२०२५
बोर्ड क्र.५०

श्री.रंगनाथ बंडु साबळे,
रा.गोंधनखेडा, ता.जाफ्राबाद, जि.जालना — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
पोलीस उपनिरीक्षक,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, भोकरदन, जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, भोकरदन, जि.जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०८.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.महादेव बाबुराव चव्हाण, सहायक पोलीस निरीक्षक उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.०५.२०२५ | पोलीस कॉन्स्टेबल प्रकाश दौलत पठाडे हे पारध पोलीस स्टेशनला कर्तव्यावर असताना त्यांच्यावर लाचलुचपत प्रतिबंधक विभागामार्फत लाच स्विकारतांना पकडले असता त्या अनुषंगाने त्यांच्यावर झालेल्या एफ.आय.आर. ची प्रमाणित केलेली प्रत तसेच दि.२३.१२.२०२४ रोजी पोलीस महासंचालक यांना दिलेल्या तक्रारी अर्जाच्या अनुषंगाने पोलीस नाईक प्रकाश दौलत पठाडे यांनी उपविभागीय पोलीस अधिकारी साहेबांना दिलेल्या वडीलोपार्जित रुपखेडा शिवारातील १९ एकर जमिनीच्या ७/१२ च्या प्रमाणित केलेल्या प्रती तसेच त्यांनी दिलेले त्यांच्या कुटूंबाचे आधार कार्डच्या प्रमाणित प्रती तसेच दि.२३.१२.२०२४ रोजी दिलेल्या तक्रारी अर्जामध्ये नमूद केलेल्या ९८६०४६१३४६, ९४२१६१५४५४, ९६३७४८१०१० या संशयीत क्रमांकाचे सीडीआर व एसडीआर च्या प्रमाणित केलेल्या सत्यप्रती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेली माहिती अपूर्ण आहे. जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती ७/१२ व आधार कार्डची माहिती समाविष्ठ नाही. माहिती अर्जानुसार ज्या माहितीची मागणी

केलेली आहे तीच माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली आणि अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०१.०७.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली ७/१२ ची माहिती ही कार्यालयाशी संबंधित नसल्याने व आधारकार्डची माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्याने ती उपलब्ध करुन देता येत नसल्याचा प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील निर्णयामध्ये ऊहापोह करुन देय होणारी माहिती दिली असल्याचा निष्कर्ष काढुन अपिलार्थी यांचे प्रथम निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण माहिती, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपूर्ण माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देय होणारी माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती मिळाली असल्याचे अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान मान्य केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 547 दिनांक : 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४८०४/२०२५**
**बोर्ड क्र.५१**

श्री.गणेश हरीभाऊ गायकवाड,
रा.भराडखेडा, पो.ता.बदनापूर, जि.जालना — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, बदनापूर, जि.जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, जालना — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.सचिन सानप, पोलीस उपनिरीक्षक उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.०७.२०२५ | पोलीस निरीक्षक, बदनापूर पोलीस स्टेशन यांच्याकडे व संबंधितांकडे दि.०९.०७.२०२५ रोजी बाबासाहेब वाल्मिक दराडे, बबन विठ्ठलराव शिंदे दोघेही रा.भराडखेडा, सबंधित तलाठी, मंडळ अधिकारी, नायब तहसिलदार, तहसिलदार यांच्याविरुध्द दिलेल्या टंकलिखीत सहापानी अर्जानुसार प्रत्यक्षात कार्यवाहीसाठी होत असलेल्या प्रचंड विलंबाच्या कारणमिमांसेसह इत्यंभुत माहिती देण्यात यावी, सदरील गैरअर्जदाराविरुध्द बदनापूर पोलीस स्टेशनमध्ये विविध कलमान्वये कायदेशीर गुन्हे दाखल करण्यास तसेच नमूद गैरअर्जदाराविरुध्द सीआरपीसी कलम ११० प्रमाणे चॅप्टर केसचा खटला दाखल करण्यास होत असलेल्या प्रचंड विलंबाच्या कारणमिमांसेसह इत्यंभुत माहिती देण्यात यावी, सदर प्रकरणातील चौकशी अधिकाऱ्यांनी अर्जदाराचा, गैरअर्जदारांच्या, साक्षीदारांच्या घेतलेल्या जाबजबाबांच्या सत्यप्रती, सदर प्रकरणातील चौकशी अधिकाऱ्याचे व पोलीस निरीक्षकांचे संपूर्ण नाव, हुद्दा व मोबाईल क्रमांकासह संपूर्ण माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. त्यामुळे माहिती अर्जात ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती उपलब्ध

करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०७.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, अपिलाथी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात दि.०८.१०.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असल्याबाबत दि.२५.०९.२०२५ रोजी सुनावणी नोटीस निर्गमित केलेली आहे. तथापि सदर नोटीशीच्या अनुषंगाने सुनावणी होऊन निर्णय पारित करण्यात आला किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण व निरर्थक माहिती दिलेली आहे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केल्याप्रमाणे उपलब्ध कागदपत्राचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद देऊन माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे अपिलार्थी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत:-

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, बदनापूर, जि.जालना यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती **(पूर्वी दिलेली माहिती वगळून)** अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र.-548- दिनांक :-16/1/26- नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४८०५/२०२५**
**बोर्ड क्र.५२**

श्री.संजय सांडु सुरासे, — अपिलार्थी
रा.किन्होळा, पो.दाभाडी, ता.बदनापूर, जि.जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, बदनापूर, जि.जालना

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, जालना

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.ए.ए.राठोड, सहायक पोलीस निरीक्षक उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०७.२०२५ | बदनापूर पोलीस ठाणे, ता.बदनापूर, जि.जालना येथे प्रथम खबर क्रमांक ००८७, भारतीय दंड संहिता (बी.एन.एस.) २०२३ चे कलम १०८ अन्वये दि.२१.०३.२०२५ रोजी दाखल असलेले गुन्ह्याच्या अनुषंगाने पोलीस निरीक्षक, बदनापूर पोलीस ठाणे यांना व संबंधित सत्तावीस जणांना दि.२०.०६.२०२५ रोजी दिलेल्या लेखी सातपानी अर्जानुसार केलेल्या संपूर्ण कार्यवाहीची माहिती देण्यात यावी, सदर गुन्ह्यातील आठ-दहा साक्षीदारांचे जाबजबाब नोंदविण्यास तसेच सदर गुन्ह्यात आठ आरोपींचा समावेश करण्यास होत असलेल्या प्रचंड विलंबाच्या कारणमिमांसेसह किन्होळा येथील झोपडपट्टीमधील आमच्या राहत्या घरी शासकीय खर्चाने अर्थात शंभर टक्के मोफत फिक्स पाईट चोविस तास पोलीस बंदोबस्त प्रत्यक्षात केव्हापासुन देण्यात येणार असल्याची संपूर्ण माहिती देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी आहे. त्यामुळे माहिती अर्जात ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या

माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.०२.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात दि.०८.१०.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली असल्याबाबत दि.२५.०९.२०२५ रोजी सुनावणी नोटीस निर्गमित केलेली आहे. तथापि सदर नोटीशीच्या अनुषंगाने सुनावणी होऊन निर्णय पारित करण्यात आला किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अपूर्ण व निरर्थक माहिती दिलेली आहे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अपूर्ण व दिशाभूल करणारी माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केल्याप्रमाणे उपलब्ध कागदपत्राचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद देऊन माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेली माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे अपिलार्थी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, बदनापूर, जि.जालना यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली माहिती **(पूर्वी दिलेली माहिती वगळून)** अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र. २१।६

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

जा.क्र. 549 दिनांक : 16/1/26 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४९५६/२०२५**
**बोर्ड क्र.५३**

श्री.बाबुराव उमाजी कावळे,
रा.गणेशनगर, गोलापांगरी, ता.जि.जालना — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, तालुका जालना, अंबड चौफुली, रेस्ट हाऊस जवळ, जालना — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, जालना — उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०३.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.ए.ए.राठोड, सहायक पोलीस निरीक्षक उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०६.२०२५ | १. दि.२८.०६.२०२५ रोजी बाबुराव कावळे ह्यास कोणत्या तक्रारीवरुन दुपारी ०३.०० वाजल्यापासुन पो.स्टे.ला बसवुन ठेवले,<br>२. मा.न्यायालयात R.C.S १००/२१ व R.C.S. ९७/२१ बाबत रोजीचे काम करण्यासाठी काम बंद करण्याचे आदेश दिले,<br>३. दि.२८.०६.२०२५ चे ०३ ते रात्रीचे सीसीटीव्ही फुटेज मिळणे,<br>४. P.I. यांचे फोन कॉल C.D.R. दि.२८.०६.२०२५ मिळणे बाबत P.I. साबळे यांचे मोबाईल C.D.R दि.२८.०६.२०२५ |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जात मागणी केल्याप्रमाणे मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी सीसीटीव्ही फुटेज तसेच सीडीआरची मागणी केलेली आहे. पोलीस स्टेशनमध्ये पिडीत मुली, पिडीत महिला ह्या तक्रार देण्यासाठी येत असतात. या परिस्थितीत असे सीसीटीव्ही फुटेज प्रकट करणे संयुक्तिक ठरत नाही. तसेच सीडीआर

ही वैयक्तिक बाब असल्याने ते उपलब्ध करुन देता येत नाही. मुद्दा क्र.२ नुसार अपिलार्थीस कोणती माहिती हवी आहे याचा स्पष्ट बोध होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.०४.०७.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत केलेली आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२३.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केल्याप्रमाणे उपलब्ध कागदपत्राचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने प्रतिसाद देऊन माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली बहुतांश माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थी यांचेशी संबंधित सीसीटीव्ही फुटेज (उर्वरित सर्व माहिती वगळून) अपिलार्थीस उपलब्ध करुन देणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन, तालुका जालना यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद माहितीसंदर्भात केवळ अपिलार्थी यांचेशी संबंधित सीसीटीव्ही फुटेज **(उर्वरित सर्व माहिती वगळून)** अपिलार्थीस, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावे.

२. उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, जालना यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 550 दिनांक : 18/1/26 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ६८, ७५, ७६ व ४१७३/२०२५ (०४)**

| | |
|---|---|
| श्री.रविंद्र बळीराम मोरे,<br>रा.साळेगाव, पो.सांडस, ता.कळमनुरी, जि.हिंगोली | अपिलार्थी |

विरुध्द

| सुनावणी बोर्ड क्रं. | द्वितीय अपील क्रमांक | जन माहिती अधिकारी / प्रथम अपिलीय अधिकारी | उत्तरवादी |
|---|---|---|---|
| ५४ | ६८/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (यांत्रिकी), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली | **उत्तरवादी क्र.१** |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली | **उत्तरवादी क्र.२** |
| ५५ व ५६ | ७५/२०२५ व ७६/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा जिल्हा कृषि अधिकारी (सा), जिल्हा परिषद, हिंगोली | **उत्तरवादी क्र.१** |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद, हिंगोली | **उत्तरवादी क्र.२** |
| १०२ | ४१७३/२०२५ | जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली | **उत्तरवादी क्र.१** |
| | | प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली | **उत्तरवादी क्र.२** |

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०१.२०२५ (०३) व दि.१५.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये ०४ द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी, उपअभियंता (यांत्रिकी), श्री.संजय एस.अग्रवाल, प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री.आर.एस.नरवाडे, जन माहिती अधिकारी तथा जिल्हा कृषि अधिकारी (सा), श्री.जाधव संग्राम रामचंद्र, प्रथम अपिलीय अधिकारी तथा कृषि विकास अधिकारी, श्री.वायसे अतुल शाहुराव, जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, श्री.वाघमारे यु.एस. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या ०४ जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| अ.क्र. | बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|---|
| १ | ५४ | १३.०५.२०२४ | १. योजनेचे विविध कामे मिळण्याकरिता ग्रामपंचायतीने सादर केलेल्या ठरावाच्या प्रती, २. गावनिहाय कोणकोणत्या कामांना मंजुरी देण्यात आली |

| | | | |
|---|---|---|---|
| | | | त्या कामाची नावनिहाय यादी, ३. योजनेच्या गावनिहाय, नावनिहाय विविध कामांना देण्यात आलेल्या रकमेच्या निधीची यादी, ४. योजनेवर कार्य करणाऱ्या कर्मचारी, अधिकारी, तांत्रिक अधिकारी, पदनिहाय व नावनिहाय आणि निविदा देण्यात आलेल्या कंत्राटदाराची नावनिहाय यादी, ५. भूजल सर्वेक्षण व पाण्याची पातळी तपासणी करुन भूजल सर्वेक्षण अधिकारी यांनी आपल्या कार्यालयाला सादर केलेले प्रमाणपत्र प्रत किंवा अहवालाची प्रत, ६. योजना कार्यान्वयित करुन हर घर जल, हर घर नळ पाणी पुरवठा पुरविण्यात येत आहे त्या गावाची गावनिहाय यादी, ७. कंत्राटदार यांना पूर्ण कामे करण्यासाठी देण्यात आलेल्या गावांना मुदत वाढीचा दिनांक व मुदत संपलेल्या गावाची यादी, ८. योजनेची कोणकोणती कामे पूर्ण व कोणकोणते कामे अपूर्ण गावनिहाय यादी, ९. कंत्राटदारांनी, तांत्रिक अधिकारी यांनी योजना कार्यान्वयित करुन कामे पूर्ण केले असल्यास आपल्या कार्यालयाकडे सादर केलेल्या काम पूर्ण केले असल्यास आपल्या कार्यालयाकडे सादर केलेल्या काम पूर्णत्वाचा दाखला किंवा प्रमाणपत्राची प्रत, |
| २ | ५५ | १३.०५.२०२४ | हिंगोली जिल्ह्यातील वसमत, हिंगोली, सेनगाव, औंढा, कळमनुरी या तालुक्यात राबविण्यात आलेल्या जुनी विशेष घटक योजना सिंचन विहीर / OTSP / MADA योजनेची माहिती मिळणेबाबत, सन २०१० ते २०२४,<br>१. वरील विषयी सदरील योजनांचे वर्षनिहाय अंदाजपत्रक (इस्टीमेट), २. लाभार्थ्यांना देण्यात आलेल्या मंजूर रकमेची यादी, ३. योजनेवर कार्य करणारा प.स. कर्मचारी, अधिकारी, तांत्रिक अधिकारी नाव व पदनामासह वर्षनिहाय कार्यकाळाची यादी, ४. मंजूर झालेल्या व काम पूर्ण करण्यात आलेल्या सिंचन विहिरीवर किती खर्च करण्यात आला त्याची यादी, अपूर्ण सिंचन विहिरीवरील खर्चाची शिल्लक रक्कमेसह यादी, |
| ३ | ५६ | १३.०५.२०२४ | हिंगोली जिल्ह्यातील वसमत, हिंगोली, सेनगाव, औंढा, कळमनुरी या तालुक्यात राबविण्यात येत असलेल्या डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वावलंबन योजनेची माहिती मिळणेबाबत, सन २०१६ ते २०२४,<br>१. वरील विषयी सदरील योजनांचे वर्षनिहाय अंदाजपत्रक (इस्टीमेट), २. लाभार्थ्यांची नावनिहाय व वर्षनिहाय यादी, सदरील योजनेच्या मंजूर रकमेच्या खर्चाची तपशिलाची यादी, ३. योजनेवर कार्य करणारा प.स. कर्मचारी, अधिकारी, तांत्रिक अधिकारी नाव व पदनामासह वर्षनिहाय कार्यकाळाची यादी, ४. मंजूर झालेल्या व काम पूर्ण करण्यात आलेल्या सिंचन विहिरीवर वर्षनिहाय काम पूर्ण करण्यात आलेल्या सिंचन विहीरीवर किती खर्च करण्यात आला रक्कमेच्या तपशिलासह यादी, अपूर्ण सिंचन विहिरीवरील खर्चाची शिल्लक रकमेसह यादी, ५. वरील विषयी मंजूर झालेल्या लाभार्थ्यांनी वर्षनिहाय व मुदतीत सिंचन विहिरी न करणाऱ्या लाभार्थ्यांची यादी, |
| ४ | १०२ | ०२.०५.२०२५ | मग्रारोहयो योजना व डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वालंबन योजने अंतर्गत विहीर व इतर बाबीसाठी मौजे झरा, ता.कळमनुरी येथील मनोहर श्रावण सोनके याची निवड झाल्यानुसार आपल्या कार्यालयातंर्गत दिलेल्या विहिरीची व इतर बाबीची माहिती मिळणेबाबत, सन २०२० ते २०२३,<br>उपरोक्त विषयी मग्रारोहयो व डॉ.बाबासाहेब आंबेडकर कृषि स्वालंबन निवड झाल्यानुसार आपल्या कार्यालयाकडे असलेल्या मूळ संचिका, कार्यारंभ आदेश, अंदाजपत्रक, मोजमाप पुस्तिका, कामपूर्णत्वाचा दाखला, भूजल सर्वेक्षण अधिकारी प्रमाणपत्र विहिरीचा फोटो आणि संबंधित योजनेवर काम करणाऱ्या कर्मचारी अधिकारी तांत्रिक अधिकारी यांचे नाव व हुद्दा, |

२. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली

माहिती मिळालेली नाही. माहिती अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने असे नमूद करण्यात येते की, ज्या योजनेसंदर्भात माहिती मागितलेली आहे त्या योजनमध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला आहे. सदर योजनेतील सत्यता ज्ञात करुन घेण्याकरिता व झालेला भ्रष्टाचार उघड करण्याकरिता माहितीची मागणी केलेली आहे. तथापि झालेला भ्रष्टाचार उघड होऊ नये म्हणून संबंधित जन माहिती अधिकारी माहिती देत नाहीत. सदर चारही माहिती अर्जानुसार मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी खरी माहिती दडविली असल्यामुळे त्यांचेविरुध्द अधिनियमातील तरतुदीनुसार यथोचित कारवाई अनुसरण्यात यावी. संबंधित जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती दिलेली आहे ती समाधानकारक नाही.

३. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (यांत्रिकी), ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अत्यंत विस्तृत स्वरुपाची आहे. तसेच अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयाच्या अधिनस्त सर्व पंचायत समितीशी संबंधित आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.११.०६.२०२४ व दि.२०.०२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अवलोकन करणेबाबत अपिलार्थी यांना सुचित करण्यात आलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.०८.०८.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. अपिलार्थी हे वारंवार निरनिराळ्या प्राधिकरणांकडे माहिती अर्ज सादर करतात. अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्यानंतर बहुतांशवेळा अपिलार्थी प्राप्त माहितीतुन एखाद्या अधिकारी किंवा कर्मचाऱ्यास हेतुपुरस्सरपणे त्रास देण्याच्या उद्देशाने त्यांचेविरुध्द वरिष्ठांकडे तक्रारी अर्ज सादर करतात. अपिलार्थी यांच्या अशा भूमिकेचा विपरित परिणाम दैनंदिन कामकाजावर होत आहे.

४. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा कृषि अधिकारी (सा), जिल्हा परिषद, हिंगोली यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात कागदपत्र स्वरुपात उपलब्ध असलेली जवळजवळ ८२६ पृष्ठांची माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.. तसेच उर्वरित माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचेही अपिलार्थीस अवगत करण्यात आलेले आहे. तथापि या नंतरही अपिलार्थी यांचे समाधान होत नाही. अपिलार्थी वारंवार माहिती अर्ज, तक्रार अर्ज, निवदने सादर करुन प्रशासनास वेठीस धरतात, प्रशासनावर दबाब निर्माण करण्याचा प्रयत्न करतात. अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिल्यास प्राप्त झालेल्या माहितीमध्ये अपिलार्थी यांना काही कमतरता वाटल्यास त्या अनुषंगाने अपिलार्थी संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचेविरुध्द वरिष्ठांकडे तक्रार दाखल करतात. अपिलार्थी यांच्या अशा भूमिकेमुळे दैनंदिन शासकीय कामाचा खोळंबा होत आहे.

५. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध माहिती अपिलार्थीस प्रदान करण्यात आलेली आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेल्या माहितीने अपिलार्थी यांचे समाधान होत नाही. अपिलार्थी हे माहिती अधिकारातंर्गत प्राप्त झालेल्या माहितीच्या अनुषंगाने अधिकारी / कर्मचारी यांच्याविरुध्द वरिष्ठांकडे तक्रारी करुन संबंधित अधिकारी / कर्मचारी यांना वेठीस धरतात. तसेच अशा तक्रारी मागे घेण्याकरिता किंवा तडजोड

करण्याकरिता पैशाची मागणी करतात. अपिलार्थी हे पूर्वग्रहदुषित होऊन नियमित माहिती अर्ज, निवेदने, तक्रारी करतात. अपिलार्थी कार्यालयात येऊन दमदाटी करुन प्रशासनावर दबाव निर्माण करण्याचा देखील प्रयत्न करतात. अपिलार्थी यांच्या अशा कृतीमुळे शासनाचे उत्तरदायित्व पार पाडणे कठीण होत आहे.

६. प्रस्तुत प्रकरणात, आज रोजीच्या व यापूर्वीच्या आयोगापुढील सुनावणीच्या अनुषंगाने आयोगाच्या असे निदर्शनास आलेले आहे की, अपिलार्थी हे नियमित माहिती अधिकारातंर्गत माहिती, प्रथम अपील व व्दितीय अपिले सादर करतात. या प्रकरणी अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपिले दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्यामुळे, अपूर्ण माहिती, परिपूर्ण माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जांव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी मागणी केलेली बहुतांश माहिती विस्तृत, व्यापक व मोघम स्वरुपाची आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधनसामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते. ही बाब माहिती अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे अशा स्वरुपाचे माहिती अर्ज व्यवहार्य ठरत नाहीत. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत.

७. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या प्रस्तावनेमध्ये असे नमूद केले आहे की,

"ज्या अर्थी, लोकशाहीमध्ये माहितगार नागरिक समूह आणि माहितीची पारदर्शकता या बाबी ज्या कार्यशिलतेच्या दृष्टीने, तसेच भ्रष्टाचाराला आळा घालण्याच्या व राज्य शासनाने व त्यांचे यंत्रणा यांना प्रजेला जाब देण्यास उत्तरदायी ठरविण्याच्या दृष्टीने अत्यावश्यक आहेत."

आणि ज्या अर्थी, प्रत्यक्ष व्यवहारात माहितीच्या प्रकटणामुळे अन्य सार्वजनिक हितसंबंधांना तसेच शासनाचे कामकाज कार्यक्षमरित्या चालणे, मर्यादित राजकोषीय साधनसंपत्तीचा इष्टतम वापर होणे आणि संवेदनक्षम माहितीची गोपनियता राखणे, या बाबींनाही बाधा येण्याची शक्यता आहे.

आणि ज्या अर्थी, लोकशाहीच्या आदर्शाची परमोच्यता कायम राखतांना, या परस्परविरोधी हितसंबंधांचा मेळ घालणे आवश्यक आहे.

त्या अर्थी, आता माहिती मिळविण्याची इच्छा असणाऱ्या नागरिकांना विविक्षत माहिती पुरविण्याकरिता तरतूद करणे इष्ट होईल. म्हणून शासकीय कामकाज सुचारु व सामोपचाराने चालविणे आणि माहिती अधिकाराचे कामकाजात सुसूत्रता यांचा ताळमेळ घालणे आवश्यक आहे.

८. मा.सर्वोच्च न्यायालयाने, सिव्हील अपील 6454/2011, दिनांक ०९.०८.२०११ रोजी Appealicants Central Board of Secondary Education & Anr. Vs Aditya Bandopadhyay & Ors. Respondents या प्रकरणी खालील आदेश दिले आहेत.

"The Act should not be allowed to misused or abused, or to become a tool to abstract the national development and integration, or to destroy the peace, tranquility and harmony among its citizens. Nor should it be converted into a tool of oppression or intimidation of honest officials striving to the tot do their duty-Nation does not want a scenarios where 75 % of the staff of public authorities spend 75 % of their time in collecting and furnishing information to

applicants instead of discharging their regular duties. The threat of penalties under the RTI Act and pressure of the authorities under the Act should not lead to employees of a public authorities prioritizing information furnishing, at the cost of their normal and regular duties."

तसेच शासकीय कामकाजावर विपरीत परिणाम होतो व अशा प्रकारची माहिती जमा करण्यासाठी शासकीय यंत्रणेचा वेळेचा अपव्यय होतो. त्यानुसार प्रस्तुत कायद्याचा मुख्य उद्देश कामकाजात पारदर्शकता, सामान्य जनतेला / नागरीकांना माहिती मिळावी आणि जनतेने माहिती जाणून घेऊन शासकीय कामकाज कार्यक्षम होणे व त्यात समन्वय प्रस्थापित होणे हा आहे. जर अशाप्रकारे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ या कायद्याचा दुरुपयोग झाल्यास निश्चितपणे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना मुख्य कार्यालयीन कामकाज सोडुन प्राप्त माहिती अर्जावर अधिनियमाप्रमाणे कामकाज करावे लागेल. त्यामुळे शासकीय यंत्रणेच्या वेळेचा अपव्यय होऊन त्याचा विपरीत परिणाम शासकीय कामकाजावर होईल.

९. मा.उच्च न्यायालय आंध्रप्रदेश, हैद्राबाद येथील रिट पिटीशन क्र.20182, दिनांक २७.०१.२००९ मध्ये खालील आदेश दिलेले आहेत.

"The Act is an effective device which if utilized judiciously and properly, would help the citizens to become more informed. It no doubt relieves an applicant from obligation to disclose the reason as to why he wants the information. However, indiscriminate efforts to secure information just for the sake of it, and without there being nay useful purpose to serve, would only put enormous pressure on the limited human resources, that are available. Diversion of such resources, for this task would obviously, be, at the cost of ordinary functioning. Beyond a point, it may even become harassment, for the concerned agencies. Much needs to be done in this direction to impart a sense of responsibility on those, who want to derive benefit under the Act to be more practical and realistic."

१०. प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने, मा.सर्वोच्च न्यायालय, मा.उच्च न्यायालय व मा.केंद्रीय माहिती आयोग आणि राज्य माहिती आयोग यांनी वेळोवेळी पारित केलेले निर्णय विचारात घेता, एकाच व्यक्तीने नियमित माहिती अधिकार कायद्याखाली माहिती अर्ज / अपिले करणे माहिती अधिकार कायद्यामध्ये अभिप्रेत / अपेक्षित नाही. यावरुन अपिलार्थी हे माहिती अधिकार कायद्याचा मोठ्या प्रमाणावर दुरुपयोग करुन संबंधित शासकीय कार्यालयास / प्राधिकरणास वेठीस धरत असुन त्यांच्या या कृतीमुळे संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणांचे दैनंदिन कामकाज ठप्प होण्याचा गंभीर धोका निर्माण झाला आहे. अशा नियमित अर्ज करण्याच्या सवयीमुळे संबंधित शासकीय कार्यालये / प्राधिकरणे यांचा बहुमुल्य वेळ व शक्ती अधिक प्रमाणात खर्ची पडुन सदर शासकीय कार्यालयांकडुन सर्व सामान्य जनतेला ज्या सेवा देणे अभिप्रेत आहे त्या महत्वाच्या शासकीय कामकाजावर गंभीर परिणाम होण्याचा धोका देखील निर्माण झालेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जान्वये मागणी केलेल्या माहितीतून कोणतेही व्यापक जनहित साध्य होत असल्याचे स्पष्ट होत नाही. वारंवार माहितीचे अर्ज करुन मागणी केलेल्या माहितीच्या मागणीमुळे शासकीय यंत्रणेतील मनुष्यबळ व साधन सामग्री यावर ताण येऊन सर्वसामान्य नागरिकांच्या दैनंदिन शासकीय कामे

पूर्ण करण्याच्या शासकीय कार्यालयाच्या / प्राधिकरणाच्या क्षमतेवर विपरित परिणाम होऊन शासकीय कामकाजाचा खोळंबा होईल व असे माहिती अधिकार कायद्यास अभिप्रेत नाही, असे आयोगाचे स्पष्ट मत झालेले आहे.

सबब, आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करत आहे.

**आदेश**

अपिलार्थी यांची उपरोक्त चार व्दितीय अपिले फेटाळण्यात येत आहेत.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जावक क्र. 551 दि. 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १३२ व १७०/२०२५ (०२)**
**बोर्ड क्र.५७ व ५८**

श्री.शंकर नागोराव काशिद,
रा.सवना, ता.सेनगाव, जि.हिंगोली — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, जिल्हा परिषद परिसर, हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०९.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.एस.टी.काळे, कनिष्ठ प्रशासन अधिकारी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दोनही प्रथम अपिलांवर सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या दोनही माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली संपूर्ण माहिती दि.२९.११.२०२५ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेली आहे. सदर प्राप्त झालेल्या माहितीबाबत कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे विचाराधिन व्दितीय अपिले निकाली काढण्यात यावीत, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांचा उपरोक्त युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन दोनही व्दितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत:, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 552 दिनांक :- 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २५६/२०२५
बोर्ड क्र.५९

ॲड.सुधाकर रामचंद्र जाधव,
रा.मानेनगर, ऑइस्टर सोसायटी, शिवसागर कॉलनी, रास बिहारी मैरी लिंकरोड बी विंग, फ्लॅट नं.बी-२३, पंचवटी, नाशिक — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपअभियंता ( यांत्रिकी),
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१६.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (यांत्रिकी), श्री.संजय एस.अग्रवाल व प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, श्री.आर.एस.नरवाडे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.०८.२०२४ | कार्यकारी अभियंता ग्रामीण पाणीपुरवठा विभाग जि.प.हिंगोली यांच्या कार्यक्षेत्रात प्रत्येक ठेकेदाराला दिलेल्या कार्यारंभ आदेशानुसार सध्या सुरु असलेल्या व सुरु नसलेल्या तसेच खुप दिवसापासुन प्रलंबित असलेल्या व प्रगतीत असलेल्या तसेच पूर्ण झालेल्या वरील सर्व कामाचे पिनकोडसह सविस्तर पत्त्यासहीत सर्वसाधारण वर्णन देऊन प्रत्येक कामासाठी कामनिहाय बाबवार मिळालेला प्रशासकीय निधी व प्रत्येक कामासाठी आजअखेर प्रत्यक्ष:त झालेला खर्च याची रोखलेखा पत्रक देणे तसेच प्रत्येक कामाचे अंदाजपत्रक व मुल्यांकन देणे, तसेच जी कामे रु.पंचविस लाख रुपये किंमतीपेक्षा जास्त असतील अशी सर्व कामे व्ही.सी.व्दारे पाहण्यासाठी-- |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे अशी माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता काही कालावधी लागलेला आहे. सदर एकत्रित / संकलित केलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे सदर माहिती उपलब्ध करुन

देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अर्जाची दखल न घेतल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरिता सोबत आणलेली आहे. तथापि आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (यांत्रिकी), ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 553 दिनांक : 16/1/26 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २९३८/२०२५
बोर्ड क्र.६०

श्री.अंबादास भिका फुले, — अपिलार्थी
रा.पिसादेवी रोड, जय मल्हार चौक, हरसिध्दीमातानगर, हर्सुल, छत्रपती संभाजीनगर

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपअभियंता (यांत्रिकी),
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता,
ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली

(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.११.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता (यां), श्री.संयज एस.अग्रवाल व प्रथम अपिलीय अधिकार तथा कार्यकारी अभियंता, श्री.आर.एस.नरवाडे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ३०.०४.२०२५ | १. जिल्हा परिषद हिंगोली सरळसेवा भरती सन २०२३ मध्ये कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (बांधकाम ग्रापापु) या पदाकरिता दि.१७.११.२०२३ रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेत मूळ कागदपडताळणीअंती नियुक्ती दिल्यानंतर पदावर रुजू झालेल्या उमेदवारांची प्रवर्गनिहाय माहिती,<br>२. जिल्हा परिषद हिंगोली सरळसेवा भरती सन २०२३ मध्ये कनिष्ठ अभियंता (स्थापत्य) (बांधकाम ग्रापापु) या पदाकरिता दि.१७.११.२०२३ रोजी घेण्यात आलेल्या परीक्षेत मूळ कागदपडताळणीअंती नियुती दिल्यानंतर पदावर रुजू न झाल्यामुळे किंवा सोडुन गेल्यामुळे प्रतिक्षा यादीतील उमेदवारांची नियुक्ती केली गेलेली असल्यास अशा उमेदवारांची प्रवर्गनिहाय माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जानुसार मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती दि.१८.१२.२०२५ रोजी नोंदणीकृत टपालाव्दारे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळालेली नसल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. ५५५ दिनांक : 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ८५९/२०२५**
**बोर्ड क्र.६८**

श्री.खिल्लारी पिराजी लक्ष्मण, — अपिलार्थी
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तोंडपुर केंद्र वारंगा फाटा,
ता.कळमनुरी, जि.हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
जेष्ठ शिक्षक,
जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, आजेगाव,
ता.सेनगाव, जि.हिंगोली

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, आजेगाव,
ता.सेनगाव, जि.हिंगोली

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २१.११.२०२४ | श्री.गोरे श्रीराम त्र्यंबक (सेवानिवृत्त माध्यमिक शिक्षक) यांनी जि.प.प्रशाला, सवना ता.सेनगाव, जि.हिंगोली येथुन निलंबित केल्याच्या व आपल्या प्रशालेत निलंबनानंतर पुर्नस्थापित केल्याच्या आदेशाची साक्षांकित प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती पुरविण्यात आलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब

नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसुन येत नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते जनहित साध्य होऊ शकते याबाबत अपिलार्थी यांना सुनावणीदरम्यान विचारणा केली असता याबाबत अपिलार्थी कोणतेही समर्थनीय कारण आयोगास सांगु शकलेले नाहीत. सारांशाने अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, दि.१७.१०.२०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार देय होणार नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

प्र २११६

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 555 दिनांक : 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ८६०/२०२५**
**बोर्ड क्र.६९**

श्री.खिल्लारी पिराजी लक्ष्मण, — अपिलार्थी
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तोंडपुर केंद्र वारंगा फाटा,
ता.कळमनुरी, जि.हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
जेष्ठ शिक्षक,
जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, सवना,
ता.सेनगाव, जि.हिंगोली

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, सवना,
ता.सेनगाव, जि.हिंगोली

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२७.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.१२.२०२४ | श्री.गोरे श्रीराम त्र्यंबक, माजी माध्यमिक शिक्षक, जि.प.प्रशाला, सवना ता.सेनगाव, जि.हिंगोली यांना आपल्या प्रशालेतुन निलंबित केल्याच्या आदेशाची व निलंबनानंतर पुर्नस्थापित केल्याच्या आदेशाची साक्षांकित प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती पुरविण्यात आलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब

नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसुन येत नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते जनहित साध्य होऊ शकते याबाबत अपिलार्थी यांना सुनावणीदरम्यान विचारणा केली असता याबाबत अपिलार्थी कोणतेही समर्थनीय कारण आयोगास सांगु शकलेले नाहीत. सारांशाने अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, दि.१७.१०.२०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार देय होणार नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 556 दिनांक :- 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १९२४/२०२५**
**बोर्ड क्र.७०**

श्री.खिल्लारी पिराजी लक्ष्मण,
जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तोंडपुर केंद्र वारंगा फाटा, ता.कळमनुरी, जि.हिंगोली — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
जेष्ठ शिक्षक,
जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, कन्हेरगाव नाका, ता.जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याध्यापक,
जिल्हा परिषद माध्यमिक शाळा, कन्हेरगाव नाका, ता.जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री.गणेश केशवराव शिसोदे उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २१.११.२०२४ | श्री.मरळे किशोर भारत (माध्यमिक शिक्षक) यांना आपल्या प्रशालेतुन निलंबित केल्याच्या आदेशाची व निलंबनानंतर पुर्नस्थापित केल्याच्या आदेशाची साक्षांकित प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्यामुळे दि.२७.११.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, संबंधित त्रयस्थपक्षास माहिती प्रगट करावी किंवा कसे याबाबत विचारणा करण्यात आलेली आहे. त्यानुसार संबंधित त्रयस्थपक्षाने दि.०६.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये त्यांचेशी संबंधित कोणतीही माहिती प्रगट करण्यास नकार असल्याचे कळविलेले आहे. या नंतर अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, त्रयस्थपक्षाने घेतलेली भूमिका व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करुन दि.०९.१२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, मागणी केलेली माहिती वैयक्तिक स्वरुपाची असल्यामुळे व ती व्यापक जनहिताशी संबंधित नसल्यामुळे अशी माहिती शासन परिपत्रक दि.१७.१०.२०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार देय होणार नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, नियमबाह्य पत्रव्यवहार, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद दिला असल्याचे दिसुन येत आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसुन येत नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते जनहित साध्य होऊ शकते याबाबत अपिलार्थी यांना सुनावणीदरम्यान विचारणा केली असता याबाबत अपिलार्थी कोणतेही समर्थनीय कारण आयोगास सांगु शकलेले नाहीत. सारांशाने अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत नसल्यामुळे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, दि.१७.१०.२०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार देय होणार नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 557 दिनांक : 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४९१२/२०२५
बोर्ड क्र.७७

श्री.शेख नईम शेख लाल, — अपिलार्थी
रा.नवीन पाण्याच्या टाकीजवळ, पलटन, हिंगोली

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
सहायक प्रशासन अधिकारी,
सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
उपमुख्य कार्यकारी अधिकारी (साप्र),
जिल्हा परिषद, हिंगोली

(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.३०.१०.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी श्री.पी.व्ही.गंटाराम उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०७.०७.२०२५ | महाराष्ट्र शासन शिक्षण आयुक्तालय महाराष्ट्र राज्य पुणे यांचे पत्र जा.क्र.आशिका/आस्था-अ/२०२५/१०२/१/१२७०४७८/२०२५, दि.०२.०६.२०२५ अन्वये दिव्यांग प्रवर्गातुन नौकरी मिळविलेल्या उमेदवारांची फेर मेडिकल तपासणी करुन खोट्या प्रमाणपत्रधारक उमेदवारांवर कारवाई करणे बाबत आदेश देण्यात आलेले आहेत, त्या अनुषंगाने जिल्हा परिषद अंतर्गत करण्यात आलेल्या कार्यवाहीसंबंधी चार मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांचा मूळ माहिती अर्ज जिल्हा परिषदेच्या मध्यवर्ती आवक शाखेत सादर केलेला आहे. तथापि सदरील अर्ज नजर चुकीने शिक्षण विभागाकडे पाठविण्यात आलेला आहे. शिक्षण विभागाने सदरील अर्जाबाबत किंवा त्यावर केलेल्या कार्यवाहीबाबत सामान्य प्रशासन विभागास कोणतीही माहिती दिली नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात सामान्य प्रशासन विभागास कोणतीही कार्यवाही करता येणे शक्य झालेले नाही. तसेच अपिलार्थी यांचा प्रथम अपिलाचा अर्ज देखील सामान्य प्रशासन विभागास अप्राप्त असल्याने प्रथम अपिलीय अधिकारी यांना प्रथम अपिलावर कार्यवाही करता आलेली नाही. प्रस्तुतच्या व्दितीय अपिलाच्या सुनावणी नोटीससोबत अपिलार्थी यांचा माहितीचा अर्ज कार्यालयास प्राप्त झाल्यानंतर याबाबत शोध घेतल्यानंतर माहिती व प्रथम अपिलाचा अर्ज शिक्षण विभागास गेला असल्याचे निदर्शनास आलेले आहे. अत: अपिलार्थी यांना त्यांच्या माहिती अर्जान्वये आवश्यक

असलेली माहिती / माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. उपमुख्य कार्यकारी अधिकारी, सामान्य प्रशासन विभाग, जिल्हा परिषद, हिंगोली यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.---558--- दिनांक :---16/1/26---नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५९१/२०२५**
**बोर्ड क्र.७८**

श्री.भगवान महादजी निरगुडे,
रा.हिवरखेडा, ता.सेनगाव, जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, सोनसावंगी, ता.सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.एस.बी.ठोंबरे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.१०.२०२४ | म.ग्रा.रो.ह.योजनेतर्गत हिवरखेडा येथील सन २०१९ पासुन ते २०२४ पर्यंत विहिरीचा व गोठ्याची मंजुरी किती आहे व त्यापैकी किती विहिरीचे व गोठ्याचे काम पूर्ण झाले आहे त्या कामाचे किती व्यक्तीला बिल देण्यात आले आहे; |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांचा मूळ माहितीचा अर्ज पंचायत समिती कार्यालयाकडे सादर केलेला आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, सेनगाव, जि.हिंगोली यांनी त्यांच्या दि.१५.१२.२०२५ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती दि.१९.१२.२०२५ रोजी नोंदणीकृत टपालाव्दारे अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. तसेच मागणी केलेली माहिती nrega.drdo.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे देखील अपिलार्थीस अवगत करण्यात आलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२०.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळणेबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर

केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 559 दिनांक : 16/1/26 नोंदणीकृत टपालाव्दारे

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७३३/२०२५**
**बोर्ड क्र.७९**

श्री.अंकुश सुभाष वैद्य,
रा.माझोड, ता.सेनगाव, जि.हिंगोली — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, माझोड, ता.सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१७.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.जी.एन.काळबांडे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी, सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेली आहे. सदर प्राप्त झालेल्या माहितीबाबत कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत:, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 560 दिनांक : 16/1/26

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ७७१/२०२५
बोर्ड क्र.८०

श्री.दिनकर सुदाम खंदारे,
रा.खुडज, ता.सेनगाव, जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी,
पंचायत समिती, सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१८.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, श्री.सुरेश कांबळे उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.१०.२०२४ | पोलीस स्टेशन नर्सी (ना) येथे दि.२९.११.२०२२ ला कोणता गुन्हा दाखल केला... |

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित असल्यामुळे व या माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित नसल्यामुळे सदर मागणी केलेली माहिती देण्यात आलेली नाही. अत: अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती / वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, खोटी माहिती मिळाल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकतेच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीमध्ये कोणतेही व्यापक जनहित दिसुन येत नाही. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती प्रगट केल्यास नेमके कोणते जनहित साध्य होऊ शकते याबाबत अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपिलामध्ये काहीही नमूद केलेले नाही. सारांशाने अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (त्र) मधील व्यापक जनहिताच्या

कसोटीवर उतरत नसल्यामुळे अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, दि.१७.१०.२०१४ रोजीच्या परिपत्रकानुसार देय होणार नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 562 दिनांक : 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३६७६/२०२५**
**बोर्ड क्र.८१**

श्री.गोविंद दिनकर चाटसे,
रा.नवीन कोठा, बिग बाजार समोर, खुशी नगर, सिडको रोड, नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, आजेगाव, ता.सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.बी.एच.काकडे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०४.०४.२०२५ | देवळाबाई सखाराम चाटसे (मयत) तसेच तुळशीराम सखाराम चाटसे या नावाचे नं.८ आणि फेरफार तसेच वारसा हे चुकीचे रीतरित्या प्रकारे फेरफार झाल्याबाबत माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडुन मिळालेली आहे. तथापि उपलब्ध करुन दिलेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे. त्यामुळे माहिती अर्जानुसार ज्या माहितीची मागणी केलेली आहे तीच माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१६.०६.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जानुसार मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तसेच उर्वरित सुधारित माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, चुकीची व

दिशाभूल करणारी माहिती, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी चुकीची व दिशाभूल करणारी माहिती मिळाली असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केले की, अपिलार्थी यांना उपलब्ध माहिती देण्यात आली असुन उर्वरित सुधारित माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आलेली आहे. सदर माहिती अपिलार्थी यांनी आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**(प्रकाश इंदलकर)**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ छत्रपती संभाजीनगर**

---

**जा.क्र.**--563-- **दिनांक :**--16/1/26--

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४३६३/२०२५
बोर्ड क्र.८३

श्री.अंकुश सुभाष वैद्य,
रा.माझोड, ता.सेनगाव, जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, माझोड, ता.सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२३.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.जी.एन.काळबांडे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी, सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेली आहे. सदर प्राप्त झालेल्या माहितीबाबत कोणतीही तक्रार राहिलेली नाही. त्यामुळे विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्यात यावे, अशी विनंती आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद विचारात घेता, विचाराधिन व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत:, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 564 दिनांक : 16/1/26

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५०८०/२०२५**
**बोर्ड क्र.८५**

श्री.संजय भिमराव वाकळे,
रा.वरुडचक्रपान, ता.सेनगाव, जि.हिंगोली — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (सांख्यिकी),
पंचायत समिती, सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१०.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, श्री.सुरेश कांबळे उपस्थित आहेत. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.०८.२०२५ | श्री.माळोदे ग्रामीण गृहनिर्माण अभियंता यांनी आजपर्यंत त्यांच्या कार्यक्षेत्रातील घरकुलाचे २ रा व ३ रा हफ्ता वर्ग केल्याचे फोटो देण्यात यावे, |

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास दि.१४.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे संकेतस्थळाच्या पत्त्यासह अपिलार्थीस कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२५.०९.२०२५ रोजी सुनावणी घेऊन मागणी केलेली माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असुन ती संकेतस्थळावरुन हस्तगत करण्याचे अपिलार्थीस सुचित करुन प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती वेळेत मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली

आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती संकेतस्थळावर उपलब्ध असल्याचे कळविले असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.--565-- दिनांक :--16/1/26--

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५१९८ व ५१९९/२०२५ (०२)
बोर्ड क्र.८६ व ८७

श्री.समाधान विठ्ठल आडे,
रा.बामणी, ता.सेनगाव, जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, सोनसावंगी, ता.सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, सेनगाव, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१३.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.एस.बी.ठोंबरे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ८६ | ०४.०८.२०२५ | ग्रा.पं. सोनसावंगी येथील ग्रामनिधी (जनरल खाते) नमुना नं.०५ (किर्द) च्या छायांकित प्रती मिळणे, तसेच सन २०२४-२५ चे सदरील खात्याचे बँक स्टेटमेंट मिळणेबाबत, |
| ८७ | ०४.०८.२०२५ | सन २०२४-२५ व २०२५-२६ मध्ये ग्रा.पं.सोनसावंगी येथे वसुल करण्यात आलेल्या घरपट्टी, नळपट्टी (नमुना नं.१०) च्या छायांकित प्रती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे ती एकत्रित / संकलित करण्यास काही कालावधी लागलेला आहे. सदर एकत्रित / संकलित केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरिता आज रोजी सोबत

आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती अर्जाची दखल न घेतल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली. सदर माहिती अपिलार्थी यांनी आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.: 566 दिनांक : 16/1/26

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ००८/२०२५
बोर्ड क्र.८८

श्री.एकनाथ लिंगाजी गांजवे,
रा.पांगरी, ता.जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, लोहगाव, ता.जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, हिंगोली — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०१.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.देवानंद पुंडलिक सोनटक्के व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.बी.डी.डोरले उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ८८ | २४.०९.२०२४ | मासिक मिटींगमध्ये कर वसुली पावती बुक, १५ वा वित्त आयोग जमा व खर्च त्याचे इस्टीमेट, प्रशासकीय मान्यता, टेस्ट रिपोर्ट, बिल, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१०.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे १० दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे ती एकत्रित / संकलित करण्यास काही कालावधी लागलेला आहे.

सदर एकत्रित / संकलित केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरिता आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली. सदर माहिती अपिलार्थी यांनी आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 562 दिनांक : 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ११०/२०२५
बोर्ड क्र.८९

श्री.रमेश तुलाराम पडघन,
रा.जुमडा, पो.पेडगाव, ता.जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
सहायक प्रशासन अधिकारी,
पंचायत समिती, हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
सहायक गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०७.०१.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, श्री.धनंजय मनोहरराव पांडे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, श्री.व्ही.जी.भोजे आणि जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रा.पं. पेडगाव, श्री.बालाजी खंडुजी गव्हाणे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ८९ | २५.१०.२०२४ | १. मौजे पेडगाव येथील दि.२९.०८.२०२४ रोजी झालेल्या ग्रामसभेचे इतिवृत्त प्रोसेडिंग बुक सत्यप्रत, २. मौजे जुमडा येथील दि.२५.०९.२०२४ रोजी झालेल्या विशेष ग्रामसभेचे इतिवृत्त प्रोसेडिंग बुक सत्यप्रत, ३. जुमडा येथील रमाबाई आंबेडकर नगर ही दलित वस्ती घोषीत केलेल्या ग्रामसभेचा ठराव व सभेचे इतिवृत्त प्रोसेडिंग |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी

यांचा माहितीचा अर्ज पंचायत समिती कार्यालयाकडुन ग्रामपंचायत कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी सदर माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे ती एकत्रित / संकलित करण्यास काही कालावधी लागलेला आहे. सदर एकत्रित / संकलित केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरिता आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली. सदर माहिती अपिलार्थी यांनी आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 568 दिनांक : 16/1/26

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५४९/२०२५
बोर्ड क्र.९०

श्री.रमेश पुंजाजी जाधव,
रा.आडगाव, ता.जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, आडगाव, ता.जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती, हिंगोली — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०३.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.गजानन अशोकराव बोरकर व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.बी.डी.डोरले उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.१०.२०२४ | दि.०६.०८.२०२४ रोजी दिलेल्या अर्जावर आजपर्यंत काय कार्यवाही केली, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२४.१२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे १० दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे ती एकत्रित / संकलित करण्यास काही कालावधी लागलेला आहे. सदर एकत्रित / संकलित केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना पोस्टाने पाठविली असता, सदर माहिती अपिलार्थी

यांनी स्विकारली नाही. म्हणून अपिलार्थी यांच्या माहिती अर्जानुसार अभिलेखात उपलब्ध असलेली सर्व माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरिता आज रोजी सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात आली. सदर माहिती अपिलार्थी यांनी आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 569 दिनांक :- 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २८७०/२०२५**
**बोर्ड क्र.९१**

श्री.रमेश पुंजाजी जाधव,
रा.आडगाव, ता.जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, पंचायत समिती, हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०७.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रशासन अधिकारी, श्री.धनंजय मनोहरराव पांडे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक गट विकास अधिकारी, श्री.व्ही.जी.भोजे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ९१ | १३.०३.२०२५ | १.ग्रामपंचायत कार्यालय आडगाव येथील २०२०-२१, २०२१-२२, २०२२-२३ या तीन आर्थिक वर्षाचा लेखापरीक्षण मधील प्रलंबित आक्षेपाचा अनुपालन अहवाल दाखल झाला त्या अहवालाची छायांकित प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२८.०३.२०२५ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन मागणी केलेली माहिती उपलब्ध नसल्याचे अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. संबंधित ग्रामपंचायत कार्यालयाकडुन अनुपालन अहवाल पंचायत समितीकडे सादर करण्यात आला नसल्यामुळे माहिती उपलब्ध नाही. अपिलार्थी यांच्या प्रथम

अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.१५.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कार्यालयात उपलब्ध असल्यास १० दिवसात उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयानुसार अपिलार्थीस दि.२३.०५.२०२५ रोजीच्या पत्रान्वये माहिती कार्यालयात उपलब्ध नसल्याचे कळविण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली अशी माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष देण्याकरिता आज रोजी सोबत देखील आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थी यांना देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. तसेच या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती / वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थी यांना देण्यात आली. सदर माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थी यांनी आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 520 दिनांक :- 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४०८० ते ४८२/२०२५ (०३)

श्री.अमोल सुभाष लोणकर,
रा.राहोली बु., ता.जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, राहोली बु., ता.जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पं),
पंचायत समिती, हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०३.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये तीन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीच्या सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.दराडे बी.ए. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.बी.डी.डोरले उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या तीन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ९२ | ०९.०६.२०२५ | मौजे राहोली बु. ग्रामपंचायत ग्रामपंचायत अधिकारी हे मुख्यालयी राहत असले बाबत ग्रामसभेचे ठराव, |
| ९३ | १६.०५.२०२५ | मौजे राहोली बु. ग्रामपंचायत सन २०१६ ते २०२५ मधील मग्रारोहयो अंतर्गत नमुना नंबर ०१ ते ०७ ची छायांकित प्रत, |
| ९४ | १६.०५.२०२५ | मौजे राहोली बु. येथील ग्रा.पं. अंतर्गत म.न.रे.गा. सन २००८ ते २०१५ चे कालावधीतील ग्रामपंचायत स्तरावरील न.०१ ते १६ ची छायांकित प्रत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेतल्यानंतर दि.३०.१०.२०२५ रोजी गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हिंगोली यांना उद्देशुन लेखी निवेदन दिलेले आहे. या निवेदनामध्ये त्यांनी, माहिती मिळाली असल्याचे, समाधान झाले असल्याचे व सर्व

अर्ज परत घेत असल्याचे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.३०.१०.२०२५ रोजीचे लेखी निवेदन विचारात घेता, अपिलार्थी यांची विचाराधिन तीनही व्दितीय अपिले निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त तीन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 521 दिनांक : 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४४२९/२०२५
बोर्ड क्र.९५

श्री.दत्तराव राजाराम जऊळकर,
रा.पिपळखुटा, ता.जि.हिंगोली — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, पिंपळखुटा, ता.जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२६.०९.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.गजानन अशोकराव बोरकर व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.बी.डी.डोरले उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २९.०४.२०२४ | पंधरावा वित्त आयोगाचा मिळालेला निधी लेखी स्वरुपात माहिती<br>१. दि.०१.०२.२०२१ पासुन दि.२९.०४.२०२५ पर्यंत १५ वा वित्त आयोगातुन दरडोई किती निधी मिळाला, किती हफ्ते ग्रामपंचायतला मिळाले, त्यामुधन शासनाच्या जीआर प्रमाणे कामावर खर्च झालेल्या हफ्त्यामधुन वार्ड क्र.१, २, ३ मध्ये कोणकोणती विकास कामे झालेली आहेत त्या कामाचे इस्टीमेट, एम.बी., फायनल रिपोर्ट बिलाच्या पावत्या, ओरिजनल लेखी स्वरुपात,<br>२. दलित वस्तीत २०१९ पासुन किती निधी मिळाला व दि.२९.०४.२०२५ पर्यंत दलित वस्तीमध्ये कोठे व कोणत्या विकास कामावर खर्च केला त्या कामाचे इस्टीमेट व एमबीच्या सत्यप्रती देण्यात याव्या, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी या पदाचा पदभार नुकताच स्विकारलेला आहे. तत्कालीन जन माहिती अधिकारी मयत आहेत. अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन १० दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. अत: अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली

माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नसल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असुन ती एका पेक्षा जास्त विषयाशी निगडित आहे. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर (माहिती अर्जातील पहिल्या विषयावर) माहिती अनुज्ञेय आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, पिपळखुटा, ता.जि.हिंगोली यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व विहित तरतुदीनुसार देय होणारी एका विषयावरील माहिती (माहिती अर्जातील पहिल्या विषयाची), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, हिंगोली यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.- 572 दिनांक :- 16/1/26 नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५३४३/२०२५**
**बोर्ड क्र.९६**

श्री.लोडजी दशरथ हनवते, — अपिलार्थी
रा.बोंडाळा, ता.जि.हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, बोंडाळा, ता.जि.हिंगोली

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, हिंगोली

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२१.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यांनुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.विवेक वसंतराव सावळे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.बी.डी.डोरले उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे-

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १२.०६.२०२५ | सन १९९० ते २०२५,<br>१. मौजे बोंडाळा, ता.जि.हिंगोली येथील मालमत्ता क्र.५२ व ५६ बाबत कोणाकडुन केव्हा हस्तांतरित केली आहे किंवा कसे सर्व फेरफार व संचिकासहित सर्व कागदपत्रासह माहिती देण्यात यावी,<br>२. मौजे बोंडाळा ता.जि.हिंगोली येथील काशिराम दशरथ हनवते यांच्या नावाने ग्रामपंचायत हद्दीत किती मालमत्ता त्यांच्या व त्यांच्या कुटूंबीयातील व्यक्तीच्या नावे आहेत, त्याचा तपशिल देऊन मालमत्ते पुरावे देऊन माहिती देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती माहिती अर्जातील मागणी प्रमाणे मिळालेली नाही. जन माहिती अधिकारी यांनी जी माहिती उपलब्ध करुन देणे अपेक्षित होते ती माहिती दिलेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन

माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०६.०८.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे १० दिवसात माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अभिलेखात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना दि.२१.०८.२०२५ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदर उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती संबंधी रेकॉर्ड उपलब्ध नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी हवी असलेली माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्र आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात अपिलार्थी यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 523 दिनांक : 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५०६०/२०२५**
**बोर्ड क्र.९७**

श्री.रामजी डिंगाबर माहोरे, — अपिलार्थी
रा.जटाळवाडी, पो.मसोड, ता.कळमनुरी, जि.हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, जटाळवाडी, ता.कळमनुरी, जि.हिंगोली

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०६.११.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.ढेपे फकीरा केरबा व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.अमितकुमार मुढे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०१.०८.२०२५ | १५ नोव्हेंबर २०२२ ते २०२५ आजपर्यंत, ग्रामपंचायत कार्यालय जटाळवाडी अंतर्गत केंद्र शासन व राज्य शासन अंतर्गत राबविलेल्या विविध योजनेची सविस्तर माहिती व इतिवृत्त व इतर, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. जन माहिती अधिकारी यांनी माहिती व्हॉट्सॲपवर पाठविलेली आहे. सदर माहिती कागदपत्र स्वरुपात हवी आहे. त्यामुळे माहिती कागदपत्र स्वरुपात उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. सदर मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना पीडीएफ स्वरुपात व्हॉट्स ॲपवर पाठविण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती कागदपत्र स्वरुपात देखील उपलब्ध आहे. याबाबत आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.३०.०९.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे १५ दिवसात माहिती

अवलोकनास्तव उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, अद्याप माहिती नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी कागदपत्र स्वरुपात माहिती हवी असल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना पीडीएफ स्वरुपात उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जटाळवाडी, ता.कळमनुरी, जि.हिंगोली यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली यांना उपरोक्त निर्णयाच्या अमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 525 दिनांक : 16/1/26 नोंदणीकृत टपालाव्दारे

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७३२/२०२५**
**बोर्ड क्र.९८**

श्री.शाम परशुराम नरवाडे,
रा.गायकवाडी, ता.निपाणी, जि.बेळगाव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, जांभ (बाळापूरजवळ),
ता.कळमनुरी, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१७.०२.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.खराडे एन.डी. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, श्री.अनिलकुमार मुंढे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १५.१०.२०२४ | श्री.साहेबराव ढोके सध्या रा.नवी मुंबई यास त्यांच्या दुसऱ्या पत्नीचे नाव ज्योती (शितल) साहेबराव ढोके हिला दि.२४.०४.२०२४ रोजी मूल झाले आहे त्याची नोंद आपल्या ग्रामपंचायतमध्ये केली आहे का, असल्यास बाळाचा जन्म दाखला द्यावा, |

आज रोजी सुनावणीदरम्यान प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांचा मूळ माहितीचा अर्ज पंचायत समिती कार्यालयाकडे सादर केलेला आहे. तथापि माहिती अर्जातील माहिती ग्रामपंचायत कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे सदर माहितीचा अर्ज ग्रामपंचायत कार्यालयाकडे वर्ग करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२८.०१.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे १० दिवसात विनामूल्य माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जांभ यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांचा माहिती अर्ज ग्रामपंचायत कार्यालयास अप्राप्त असल्यामुळे सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यवाही करुन माहिती उपलब्ध करुन देता येणे शक्य झालेले नाही. आयोगाकडील सुनावणी नोटीस सोबत अपिलार्थी यांचा माहिती अर्ज कार्यालयास प्राप्त झालेला

आहे. सदर माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती अपिलार्थीस वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही अनुसरण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळावी, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्रयस्थपक्षाशी संबंधित आहे. त्रयस्थपक्षाशी संबंधित माहितीची मागणी केल्यानंतर अधिनियमातील कलम ७ (७) व कलम ११ (१) नुसार त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देणे, ही बाब नैसर्गिक न्याय व पारदर्शकेतच्या दृष्टीकोनातुन योग्य ठरते. या नंतर माहिती प्रगट करणे व्यापक जनहिताच्या कसोटीवर उतरत असल्यास अशी माहिती प्रगट करणे आवश्यक आहे. या प्रकरणी अशी कार्यवाही झाली असल्याचे निदर्शनास येत नाही. म्हणून या प्रकरणी त्रयस्थपक्षास त्यांची बाजु मांडण्याची संधी देऊन त्यांनी घेतलेली भूमिका व अधिनियमातील तरतुदी विचारात घेऊन माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन देण्याबाबत कार्यवाही जन माहिती अधिकारी करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, जांभ ता.कळमनुरी, जि.हिंगोली यांनी, वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अनुसरुन, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद माहिती / वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 575 दिनांक : 16/1/26 नोंदणीकृत टपालाव्दारे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १९२२/२०२५**
**बोर्ड क्र.९९**

श्री.रमेश तुकाराम करनोर,
रा.चिंचोडी, ता.कळमनुरी, जि.हिंगोली — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
कनिष्ठ सहायक,
पंचायत विभाग, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१४.०५.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ सहायक, श्री.प्रभाकर कऱ्हाळे (तत्कालीन) व प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, श्री.अमितकुमार मुंढे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ११.०२.२०२५ | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी यांनी अर्जदाराचे तक्रार अर्जाचे अनुषंगाने मौजे चिंचोडी ग्रामपंचायत अंतर्गत पंधराव्या वित्त आयोगाचे निधीमधुन करण्यात आलेल्या कामाची चौकशी करुन अहवाल कार्यालयात दाखल करणेबाबत.---<br>१. अर्जदार यांचे दि.०७.०१.२०२५ चे अर्जाचे अनुषंगाने चौकशी अहवालाची प्रमाणित प्रत देण्यास होणारे विलंबाचे कारणाची लेखी माहिती देण्यात यावी,<br>२. नियमानुसार अर्जदारास दि.०७.०१.२०२५ पासुन किती दिवसात चौकशी अहवालाची प्रमाणित प्रत देणे आवश्यक होते याबाबत लेखी माहिती देण्यात यावी,<br>३. अर्जदार यांचा दि.०७.०१.२०२५ रोजीचा नक्कले संबंधीचा अर्ज ज्या अधिकाऱ्याकडे प्रलंबित आहे त्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम याबाबत लेखी माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या

अनुषंगाने चौकशी अहवाल अप्राप्त असल्यामुळे माहिती उपलब्ध करुन देता आलेली नाही. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने उपलब्ध असलेली माहिती / वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.१६.०४.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे, अपिलार्थी यांनी मागणी केलेला चौकशी अहवाल उपलब्ध नसल्यामुळे सध्या माहिती उपलब्ध करुन देता येणार नसल्याचा निष्कर्ष काढुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती चौकशी प्रकरणाशी संबंधित असुन अधिनियमातील कलम ८ (१) (ज) नुसार चौकशीची प्रक्रिया पूर्ण होऊन निर्णय अंतिम झाला असल्यास माहिती देय होईल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा कनिष्ठ सहायक, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी **अद्ययावत माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती**, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.— 526 — दिनांक :— 16/1/26 —नोंदणीकृत टपालाव्दारे

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ३४७४/२०२५**
**बोर्ड क्र.१००**

श्री.सुभाष तुकाराम तरटे, — अपिलार्थी
रा.वडगाव, पो.जवळा पांचाळ, ता.कळमनुरी, जि.हिंगोली

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, वडगाव, ता.कळमनुरी, जि.हिंगोली

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, हिंगोली

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०७.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.गवळी.एस.पी. व प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, श्री.अमितकुमार मुंढे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १०० | ०८.०१.२०२५ | १. अर्जदार नागोराव तुळाराम तरटे यांनी अतिक्रमण उठविण्यासाठी दि.०१.०१.२००९ पासुन आजपर्यंत त्यांच्यावर काय कारवाईली ते अर्ज देणे,<br>२. गट विकास अधिकारी यांनी अतिक्रमण उठविण्यासाठी जे पत्र दिले ते पत्र देणे.. |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस वेळोवेळी देण्यात आलेली आहे. तसेच अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत देखील आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांना देण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२५.०३.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देणे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना आयोगासमक्ष उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. आयोगाच्या निर्देशानुसार सदर माहिती अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांना देण्यात आली. सदर माहिती अपिलार्थी यांचे प्रतिनिधी यांनी आयोगासमक्ष स्विकारलेली आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 527 दिनांक : 16/1/26

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**व्दितीय अपील क्रमांक ३७६७/२०२५**
**बोर्ड क्र.१०१**

श्री.नागोराव तुकाराम आवटे,
रा.वडगाव त.ज., पो.जवळा पांचाळ, ता.कळमनुरी, जि.हिंगोली — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामविकास अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, वडगाव, ता.कळमनुरी, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
गट विकास अधिकारी,
पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक २२.१२.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.११.०८.२०२५ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये व्दितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.एस.पी.गवळी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, श्री.अमितकुमार मुंढे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २६.०३.२०२५ | मौजे वडगाव त.ज. येथील नागोराव तरटे विरुध्द संभाजी सावजी बागल यांचे घर नं.८० व ८१ अतिक्रमण प्रकरणातील कागदपत्र व माहिती मिळणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळाली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती / वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही करण्यात येईल.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२७.०५.२०२५ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे, १० दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती

दिलेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वडगाव, ता.कळमनुरी, जि.हिंगोली यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती व माहितीसंदर्भातील वस्तुस्थिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, कळमनुरी, जि.हिंगोली यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 578 दिनांक :- 16/1/26 नोंदणीकृत टपालाव्दारे